जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

मो. : ८२६२०५६४८०, ☎ : ०२० – २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

सहसंपादक : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५४ वे ❖ अंक ५ वा ❖ जानेवारी २०२३ ❖ वीर संवत २५४९ ❖ विक्रम संवत २०७९

या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| ● जैनों को प्राण से प्यारा, सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्र हमारा | १५ |
| ● प्राकृत इंग्रजी महाशब्दकोश ९ वा खंड – प्रकाशन | १९ |
| ● श्रुत भवन संशोधन केंद्र, पुणे | २० |
| ● अंतिम महागाथा : ४८ : ज्ञान घोषित करने की चीज नहीं | २३ |
| ● सुख, दु:ख और शांती | २५ |
| ● कव्हर तपशील | २६ |
| ● मोक्ष मार्ग के २१ कदम : अहिंसक बनो (२) | ३१ |
| ● नया साल – नयी शुरवात | ३६ |
| ● सुक्ति से मुक्ति : चारित्र/चरित्र | ३७ |
| ● जिन शासन के चमकते हीरे | |
| ✲ श्री नमिराज | ४३ |
| ✲ अंबिका देवी | ४४ |
| ✲ राजा मुनिचंद्र | ४५ |
| ● मुक्ति प्राप्ती के लिए दुर्लभ बातें | ४७ |
| ● हास्य जागृति | ४९ |
| ● प्रेम की गंगा बहाते चलो | ५९ |
| ● पूर्वजांचा संदेश | ६० |
| ● धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा | ६० |
| ● नामस्मरण का बल | ६१ |
| ● ये रिप–रिप क्या है ? | ६२ |
| ● जीवन बोध : मुक्ति का मार्ग | ६३ |
| ● चलें सूक्ष्म विश्व की यात्रा पर | ६४ |
| ● कामयाबी की राह | ६५ |
| ● सहनशीलता | ६७ |
| ● बाप माझा कधी जगलाच नाही | ६९ |
| ● स्वयंपाक यायलाच हवा का ? | ७० |
| ● अल्पसंख्याकांना ३० लाखांपर्यंत कर्ज | ७१ |
| ● संपत्ती मुलांच्या नावावर करताय ? | ७२ |
| ● डॉ. दिलीप धींग – सन्मान | ७३ |
| ● IPS प्रिती जैन – वित्त मंत्रालय में | ७३ |

● पूना मर्चन्ट चेंबर, पुणे – स्किल सेंटर ७४
● सौ. सुषमा चोरडिया – पुरस्कार ७५
● एक पित्याचे आपल्या मुलांना पत्र ७६
● श्री. वालचंदजी संचेती – पुरस्कार ७७
● वेशभूषा का महत्त्व ७७
● ॲड. पांडुरंग थोरवे – सुर्य गौरव राष्ट्रीय पुरस्कार ८३
● श्री. विनोद शहा, पुणे – सन्मान ८३
● भारतीय जैन संघटना अधिवेशन – उदयपुर ८५
● व्यवसाय में शाकाहार – निष्ठा ८९
● आनंद तीर्थ चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे ८६
● जीवन जीने की कला ८७
● आर्ट ऑफ गिव्हींग ९१
● किसी का अवर्णवाद/निंदा न करना ९५
● नामको हॉस्पिटल, नाशिक ९७
● विविध धार्मिक, सामाजिक बातम्या


**जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित**

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

या अंकाची किंमत ५० रुपये.

● www.jainjagruti.in
● www.facebook.com/jainjagrutimagazine

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

● वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.

● आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/Google Pay, M. 9822086997/AT PAR चेक/पुणे चेकने/ RTGS / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**
**Bank : STATE BANK OF INDIA** **Branch : Market Yard, Pune 37.**
**Current A/c No. : 10521020146** **IFS Code : SBIN0006117**


'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२-१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia




टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

टिप : जैन जागृति अंकात प्रकाशित लेख, बातम्या, जाहिरातीचे सर्वाधिकार सुरक्षीत आहेत.

# जैनोंको प्राण से प्यारा, सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्र हमारा

**लेखिका : साईमिलन, पुणे**





जैन धर्मीयांची अस्मिता असलेले झारखंड राज्यातील गिरिडीह जिल्ह्यातील मधुबन परिसरात सम्मेद शिखरजी हे एक निसर्गदत्त तीर्थक्षेत्र आहे. मात्र, या तीर्थक्षेत्राला झारखंड सरकारने पर्यटन स्थळ म्हणून जाहीर केल्याने जैन धर्मीयां मध्ये नाराजीची लाट पसरली आहे. या निर्णयाने शिखराचे पावित्र्य धोक्यात येणार असल्याने जैन सामाजाच्या वतीने अहिंसात्मक मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. त्यानुसार झारखंडच्या या निर्णया विरोधात देशातील सर्व जैन समाज बांधव एकवटले आहेत. अहिंसा, शांततेचा संदेश देणाऱ्या जैन धर्मीयांच्या भावनांचा विचार करून श्री सम्मेद शिखरजीला पर्यटन स्थळ घोषित करू नये, अशी मागणी करत २१ डिसेंबर २०२२ रोजी देश-विदेशांतील जैन बांधवांनी त्यांचे व्यापार उदिम बंद ठेवून आणि शांततेच्या मार्गाने मूक मोर्चा, टू- व्हीलर रॅली काढून, काळ्या फिती लावून आपला निषेध व्यक्त केला आहे.

देशातील कोणतेही पर्यटन स्थळ असो, त्याला एक विशेष महत्त्व आहे. पर्यटनस्थळा मुळे रोजगार निर्मितीपासून अनेक गोष्टी साध्य होतात. त्यामुळे अनेकवेळा सरकारकडे एखादं ठिकाण पर्यटनस्थळ म्हणून घोषित करण्याची मागणी केली जाते. मात्र, झारखंड मध्ये याउलट घटना घडली आहे. सरकारने या सम्मेद शिखरजी तीर्थस्थळाला पर्यटनस्थळ घोषित केले आणि अहिंसात्मक आंदोलनाची लाट देशभर उसळली आहे. कधी नव्हे ते जैन समाजाचे लोक एका पवित्र मागणीसाठी रस्त्यावर उतरले आहेत. समेद शिखरजी हे आपले पवित्र तीर्थक्षेत्र असल्याचे सांगून ते जतन करण्याची मागणी करत आहेत. यावेळी राज्य आणि केंद्र सरकारला जैन समाजा तर्फे देशातील सर्वच राज्यांतील लहान मोठ्या गावांतून देखील निवेदन देण्यात आले आहे. पर्यटन स्थळाचा निर्णय परत घेण्यात यावा या मागणीसाठी अहिंसक पध्दतीने विरोध केला जात आहे.

**सम्मेद शिखरजी एक पवित्र तीर्थस्थळ**

सम्मेद शिखरजी किंवा श्री शिखरजी किंवा पारसनाथ पर्वत हे झारखंड राज्यातील गिरिडीह जिल्ह्यातील छोटा नागपूर पठारावरील एक महत्त्वाचे स्थान आहे. खरे तर हा निसर्गदत्त पर्वत आहे आणि जगातील सर्वात महत्त्वाचे जैन तीर्थक्षेत्र आहे. 'श्री सम्मेद शिखरजी' म्हणून ओळखले जाणाऱ्या या पवित्र पर्वतमय प्रदेशात जैन धर्माच्या २४ तीर्थकारांपैकी २० तीर्थंकरांनी मोक्ष प्राप्त केला. २३ वे तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ यांचेही निर्वाण येथेच झाले. याबरोबरच

अनेक ऋषी-मुनींनी कठोर तपश्चर्या आणि ध्यानाद्वारे येथेच मोक्ष प्राप्त केला आहे. म्हणूनच याला 'सिध्द क्षेत्र' किंवा 'तीर्थराज' असेही संबोधले जाते. दरवर्षी लाखो जैन अनुयायी येथे तीर्थंकरांच्या दर्शनासाठी येतात.

या पर्वताची उंची १ हजार ३५० मीटर (४ हजार ४३० फूट) आहे आणि हा पर्वत झारखंडमधील सर्वोच्च बिंदू आहे. गिरिडीह स्टेशन पासून मधुवन पर्यंत म्हणजे पर्वताच्या पायथ्या पर्यंतचे अंतर १८ मैल आहेत. पर्वताची चढण आणि उतरणही सुमारे २७ मैल आहे. जैन ग्रंथानुसार सम्मेद शिखरजी आणि अयोध्या यांचे अस्तित्व सृष्टीला समांतर आहे. म्हणूनच त्यांना 'शाश्वत' मानले जाते. प्राचीन धर्मग्रंथांमध्ये, तीर्थंकर आणि तपस्वी ऋषींनी येथे मोक्ष प्राप्त केला. यामुळेच सम्मेद शिखर यात्रेला सुरुवात होते, तेव्हा प्रत्येक यात्रेकरूचे मन तीर्थंकरांचे स्मरण करताना अपार भक्ती, श्रध्दा, उत्साह आणि आनंदाने भरून जाते. जैन धर्मीयांमध्ये या स्थळाबाबत एक धर्मभावना आहे. येथे तीर्थकरांच्या शिकवणीचे आणि तत्त्वांचे शुध्द आचरण केले जाते आणि त्यामुळेच हा परिसर अत्यंत पवित्र आहे. येथे आढळणाऱ्या सिंह, वाघ आदी वन्य प्राण्यांचे नैसर्गिक हिंसक वर्तन या परिसराच्या पावित्र्यामुळे दिसून येत नाही. त्यामुळे यात्रेकरूही न घाबरता प्रवास करतात. बहुधा याच प्रभावामुळे प्राचीन काळापासून अनेक राजे, आचार्य, भट्टारक, श्रावक हे आत्मकल्याण व मोक्षाच्या भावनेने तीर्थयात्रेसाठी येथे आले होते, तीर्थंकरांची पूजा, तपस्या व घोर तपश्चर्या केली होती.

**मोक्ष स्थान**

जैन धर्मशास्त्रांमध्ये या क्षेत्राचे वर्णन आहे की या ठिकाणी २४ तीर्थकरांपैकी २० तीर्थंकरांना मोक्ष प्राप्त झाला आहे. येथे या तीर्थकरांचे टोक पगल्या आहेत, तर तीर्थंकर भगवान आदिनाथ अर्थात ऋषभदेव यांनी कैलाश पर्वतावर, १२ वे तीर्थंकर भगवान वासुपुज्य यांनी चंपापुरी, २२ वे तीर्थंकर भगवान नेमीनाथ यांनी गिरनार पर्वतावर आणि २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांनी पावापुरी येथे मोक्ष प्राप्त केला आहे. सम्मेद शिखरजी येथे २३ वे तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ स्वामी यांनी कठोर तप आणि ध्यान करून मोक्ष प्राप्त केला असल्याने येथील मुख्य टोक अर्थात शिखर पारसनाथ टोक आहे.

**पर्यटन स्थळाला विरोध का?**

जैन धर्मीयांचेही म्हणणे आहे की, जर याला पर्यटन क्षेत्र बनवले तर पर्यटकांच्या येण्याने येथे मांसाहार आणि दारूचे सेवनही होईल. पवित्र जैन धर्मीय हे अहिंसावादी आहेत. पर्यटन क्षेत्र येथे झाले तर अपेयपानासह सामीष आहाराचे सेवन आणि विक्री येथे सुरू होणार आहे. सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेत मत्स्य आणि कुक्कुटपालनालाही येथे परवानगी देण्यात आली आहे. याचबरोबरच इतरही लघुउद्योगांना चालना देण्याबाबत चर्चा झाली आहे. याबरोबरच वेगवेगळ्या प्रकारचे अन्नपदार्थ, पाण्याच्या बाटल्या, प्लॅस्टिक आदींचा कचरा या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर साठण्याची शक्यता असल्याने या क्षेत्राचे पावित्र्य नष्ट होणार असल्याने या पर्यटन स्थळाला येथे विरोध आहे.

**जैन धर्मीयांच्या प्रमुख मागण्या**

केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेनजी यांना दिलेल्या पत्रात जैन धर्मीयांनी या तीर्थस्थळा बाबत काही महत्त्वाच्या मागण्या केलेल्या आहेत. यामध्ये म्हटले आहे की, जैन तीर्थकरांचे मोक्षस्थळ असलेल्या या श्री सम्मेद शिखरजी 'पारसनाथ पर्वतराज', गिरिडीह (झारखंड) ची स्वतंत्र ओळख आहे. येथील पावित्र्य आणि येथील निसर्ग संपत्तीच्या संरक्षणासाठी जागतिक जैन संघटनेने देशभर 'श्री सम्मेद शिखरजी बचाव

आंदोलन' सुरू केले आहे. यामध्ये या 'पारसनाथ पर्वतराज' ठिकाणाला वन्यजीव अभयारण्य, इको-टूरिझमसाठी मास्टर प्लॅन करून संवेदनशील झोनअंतर्गत पर्यटन स्थळ या यादीतून वगळण्यात यावे. 'पारसनाथ पर्वतराज' आणि मधुबनला मांस-मद्यविक्री मुक्त करून या क्षेत्राला पवित्र जैन तीर्थक्षेत्र घोषित करावे. पर्वतराज येथे वंदना मार्ग (प्रद क्षिणा) आहे येथे अतिक्रमण करणे, वाहन चालवणे, याबरोबरच गैर-उपभोग्य वस्तूंची विक्री करण्यास बंदी आणावी व सीआरपीएफ आणि स्कॅनर द्वारे यात्रेकरुंची सामान तपासणी, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह दोन चेक पोस्ट, वैद्यकीय सुविधा त्वरीत लागू करणे. येथे असणाऱ्या झाडांची अवैध तोड, बेकायदेशीर उत्खनन आणि निसर्ग संपत्तीला आग लावणे याला बंदी घालणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

याबाबत १७ मार्च २०२२ ला विश्व जैन संघटनेतर्फे केंद्रीय वन मंत्रालय आणि झारखंड सरकारला पुन्हा याचिका पाठवली आहे. याची दखल घेतली गेली नसल्याने २६ मार्च २०२२, २६ जून २०२२ आणि २ ऑगस्ट २०२२ रोजी देशव्यापी शांततापूर्ण निषेध जैन संस्था व जैन बांधवांनी केला आहे. मात्र, तरीही अजूनही याबाबत कारवाई झालेली नाही. संपूर्ण जैन समाजाच्या या मागण्यांबाबत झारखंड सरकार आणि केंद्र सरकारला राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे पत्र देऊन या विषयाबाबत न्याय मागण्यात आला आहे, परंतु आजपर्यंत कारवाई झाली नाही.

विश्व जैन संघटना द्वारा ११ डिसेंबर २०२२ रोजी नवी दिल्ली येथे रामलीला मैदानात 'श्री सम्मेद शिखर बचाओ' आंदोलन समर्थनार्थ विशाल रॅली आणि सभेचे आयोजन करण्यात आले.

२१ डिसेंबर २०२२ रोजी संपूर्ण भारतात लहान-मोठ्या शहरात जैन बांधवांनी आपले व्यापार बंद ठेवून शांततेच्या मार्गाने मोर्चा, टू-व्हीलर रॅली काढून कलेक्टरना निवेदन दिले आहे.

### उपोषन व राष्ट्रपतीना निवेदन

विश्व जैन संघटना द्वारा २६ डिसेंबर २०२२ पासून दिल्ली येथे ऋषभ विहार जैन मंदिर येथे उपोषन, भूक हडताल सुरु केले आहे. झारखंड सरकारने ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत आदेश मागे न घेतल्यास १ जानेवारीला जैन संत व समस्त जैन समाज विशाल पद यात्रा द्वारे राष्ट्रपती भवन येथे जाऊन राष्ट्रपतीना निवेदन दिले जाणार आहे.

### सरकारच्या निर्णयाबाबत श्रावकांमध्ये संभ्रम

श्री सम्मेद शिखरजीचा पर्यटन स्थळाचा दर्जा रद्द केला अशा बातम्या काही वर्तमानपत्रे आणि न्यूज चॅनेलवर आल्या आहेत. शिखरजीबाबत श्रावकांमध्ये संभ्रम असून, ही लढाई आपण जिंकलो असल्याचा भ्रम निर्माण झाला आहे. मात्र, केंद्र किंवा राज्य सरकारकडून याबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. मात्र, कोणत्याही बनावट बातम्यांवर विश्वास न ठेवता हे आंदोलन सर्व जैन बांधवांनी पुढे न्यायाचे आहे. तीर्थक्षेत्रच्या रूपानेच शिखरजी ओळखली जाईल असे आश्वासन बैठकीत दिले गेले आहे, मात्र अशी कोणतीही ऑर्डर लिखित स्वरूपात प्रसिद्ध केलेली नाही. १७ जानेवारी २०२३ याबाबत सुनावणी करण्यात येणार आहे, आणि त्यानंतरच निर्णय होणार आहे.


एकूणच काय तीर्थक्षेत्र श्री सम्मेद शिखरजी पर्यटन स्थळ होण्यापासून वाचवणे आणि तिथे कोणतेही विघातक कृत्य होऊ न देता ही पवित्र मोक्षभूमी अबाधित राखणे हे सकल जैन समाजाचे आद्य कर्तव्यच राहणार आहे आणि त्यासाठी अहिंसात्मक मार्गाने, जैन समाजाची अस्मिता जपत आंदोलन सुरू ठेवणे महत्त्वाचे ठरणार आहे. ●

# ३५ वर्षांच्या साधनेचे ९ वे फळ !!

# प्राकृत : इंग्रजी महाशब्दकोशाचा ९ वा खंड – डिक्शनरी प्रकाशन

**प्रेषक : डॉ. नलिनी जोशी – डायरेक्टर, सन्मति–तीर्थ,**

**मुख्य संपादक, प्राकृत – इंग्रजी शब्दकोश, पुणे. मो. ९४२१००१६१३**



पुणे : ३ डिसेंबरला मा. सुधा मूर्तींच्या हस्ते भांडारकर संस्थेत झालेल्या भूमिपूजनाची बातमी आपण सर्वांनी पेपरमध्ये वाचली असेल. फोटोही पाहिले असतील. त्या कार्यक्रमातील एक महत्त्वाची घटना मला तुमच्याशी शेअर करायची आहे. प्राकृत आणि जैनविद्येच्या क्षेत्राशी संबंधित अशी ही घटना जैन समाजाच्या दृष्टीने तर खूपच महत्त्वाची म्हणूनच लक्षवेधक आहे.

मा. सुधाताईंनी त्या दिवशी भांडारकरची एकूण ७ प्रकाशने प्रकाशित केली. त्यातील एक पुस्तक म्हणजे प्राकृत–इंग्रजी महाशब्दकोशाचा ९ वा खंड. डिक्शनरीचे पूर्ण नाव मुद्दाम देते. संबंधितांनी कृपया काळजीपूर्वक वाचावे. The Comprehensive and Criticial Dictionary of Prakrti Languages (with special Reference to Jain Literature)

स्व. नवलमलजी फिरोदियांच्या दृष्टेपणाने परिकल्पित केलेली, डॉ. अ. मा. घाटगे यांनी साकारलेली, डॉ. रामप्रकाश पोद्दार यांनी पुढे नेलेली, डॉ. अभयजी फिरोदिया यांनी प्रेरक बनून नवसंजीवनी दिलेली – अशी ही सर्व प्रकारच्या बोली प्राकृत भाषांना आणि खास करुन जैन धर्मातील मूलभूत तत्त्वज्ञान – आचार व कथांना सहजपणे कवेत घेणारी डिक्शनरी आहे. मी स्वत: इतकी भाग्यवान आहे की १९८८ सालच्या एप्रिलच्या पहिल्या दिवसापासून आजतागायत डिक्शनरीच्या प्रगती, सततची स्थित्यंतरे आणि आता ७–८ वर्षात एकतानतेने लागलेली लिंक – या सर्व अवस्था 'याचि देही, याचि डोळा' पहात आले आहे.

इतर सर्व खंडांप्रमाणेच नुकताच तयार झालेला नववा खंडही ५०० डेमी साईज पृष्ठांचा आहे. त्यात कव्हर झालेले शब्द आहेत – 'ग' ते 'गुरव'; शब्दसंख्या – ७३९०; मूळ अवतरणांची संख्या आहे २५३००. प्रत्येक शब्दाच्या भाषेनुसार आणि काळानुसार बदलत जाणाऱ्या अर्थछटा कसोशीने नोंदवण्याचा प्रयत्न त्यात केला आहे. अर्थ इंग्रजीत असल्याने जगभरातील कोणत्याही विद्यापीठात, कोणत्याही भाषेत अभ्यास करणाऱ्या प्राकृत–जैनिझमच्या संशोधकांनी ही डिक्शनरी ओरिजिनल संदर्भ प्राप्त करुन देईल.

मा. अभयजींच्या भक्कम पाठिंब्यामुळे, ६–७ 'कोअर टीम' आणि १० लोकांची 'सपोर्टिंग टीम' सातत्याने, वेगाने तरीही गुणवत्ता राखून, रोज रोज डिक्शनरी प्रगतिपथावर नेण्यासाठी प्रयत्नशील आहे. सुमारे दोन वर्षांमध्ये, पुढील म्हणजे १० वा खंड तयार करण्याचे 'टार्गेट' डोळ्यापुढे ठेवले आहे. त्यावेळी एकूण डिक्शनरीच्या सुमारे ४०% डिक्शनरी पूर्ण होईल.

भांडारकर संस्थेतील दिग्गज पूर्वसूरींची पुण्याई, फिरोदियाजींच्या ३ पिढ्यांचा पाठिंबा आणि सन्मति–तीर्थ संस्थेत शिकून, संशोधनापर्यंत पोहोचलेल्या टीमची निष्ठा आणि प्रयत्न – या सर्वांच्या अपूर्व समन्वयातून नित्य अग्रेसर असलेली डिक्शनरी – आपल्या शुभेच्छांच्या सहाय्याने संशोधनाचा एक नवा मानदण्ड स्थापन करेल – अशा पॉझिटिव्ह नोटवर – खूप काही सांगायचे असूनही आता थांबते !!! •



# अंतिम महागाथा

लेखक : प्रबुध्द विचारक पू. श्री. आदर्शऋषिजी म.सा.

*(क्रमशः )*

## ४८ : ज्ञान घोषित करने की चीज नहीं

धर्म तीर्थंकर जिस समय पृथ्वीपर विचरण करते हैं, वह समय मानवजाति के लिए परम सौभाग्य का होता है। मानव की स्वतंत्रता का मूल्य बढ जाता है। मानव के अस्तित्व को अर्थ मिलता है। जड के स्थानपर चेतना का राज्य होता है। आत्मा केंद्र में आ जाने से सभी दुःख पीडा, जन्ममरण से मुक्ति का मार्ग दिखाई देने लगता है।

धर्म तीर्थंकर अपने युग के अनुरुप धर्मव्यवस्था देते है। आत्मविज्ञान, जीवन विज्ञान प्रदान करते है। यह जीवन जितना बाहर फैला हुआ है उतना ही भीतर भी। तीर्थंकर दोनों ही जीवन जगत के परम वैज्ञानिक है। वे दोनोंही जगत को देखने, समझने की दृष्टि प्रदान करते है। मार्ग बताते हैं। उनके बताये मार्गपर अनगिनत आत्माएँ चलती है। कुछ भटक भी जाती है। जो भटक जाती है वो विरोधी हो जाती है। जैसे गोशालक भटक गया, सत्य के एक पक्ष को पकड़ बैठा। पदार्थ, घटना, समय, सत्य के अनंत पहलू होते है इसे जो समझ नहीं पाते वे मूढ होते है।

जड़-चेतन का अनंत प्रवाह सदा बहता रहता है। तीर्थंकर उसे अपने ज्ञान में देखते है। तीर्थंकर हमें निर्देश कर बताते है। मूढ जन अपने ही सोच में होते है गोशालक की तरह ही है जमाली वे भी भगवान के शिष्य थे मार्ग से भटक गए। वे भगवान के जमाई थे, पर भगवान तो वीतराग राग-द्वेष से परे है। वे स्नेह के संबंध से बाहर आ गए है। अब तो आत्मसाधना का संबंध है।

जमाली इसे पहचान नहीं पाये। वे तीर्थंकर की ऊँचाई उनकी वीतरागता से बहुत नीचे थे। ऊपर उठ नहीं पा रहे थे। जब कोई श्रध्देय या धर्मगुरु की ऊँचाई तक नहीं पहुँच पाता है तो उसे ही नीचे लानेका प्रयास करता है।

जमाली में संबंध का कुछ अहं था। उसमे कुछ पानेका दंभ भी था। ऐसे में आदमी अपनेको एक विशिष्ट मान बैठता है, विशिष्ट स्थान चाहता है। अभिप्सित न मिलनेपर एक नया पंथ खड़ा करने की चेष्टा करता है। जमाली की स्थिति इससे भिन्न नहीं थी। एक दिन वे प्रभु से आज्ञा चाहते है कि मैं अपने अनुयायियों के साथ अलग से विचरण करना चाहता हूँ भगवान मौन रहे। दूसरी बार पूछा - भगवान फिर भी मौन रहे। वे देख रहे है कि जमाली के मनमें वर्तमान और भविष्य की बात को लेकर श्रध्दा में फर्क आया है।

सर्वज्ञ ज्ञाता है, नियंता नहीं है। वे ज्ञान-प्रदान कर मार्ग बता सकते है पर किसी के कर्म पुरुषार्थ के नियंता नहीं है। व्यक्ति की स्वतंत्रता ही कर्म का सृजन करती है।

जमाली ने भगवान के मौन का अपने मन में इच्छित भावना के अनुरुप अर्थ लगाया। भगवान से अलग होकर विचरण करने लगे। साथ ही भगवान की संसारी पुत्री प्रियदर्शना भी अपने साध्वी समुदाय के साथ अलग हो गई। संसार के संबंध दूरतक जाते है, चलते है। फिर भी छूट जाते है। लेकिन हम उसीको पकड बैठते है, चिपक जाते है।

जमाली स्वतंत्र हो गए। उनकी स्वतंत्रता आत्मसाधना या धर्म व्यवस्था से संबंधित नहीं थी।

उनकी स्वतंत्रता स्वयं को स्थापित करने के लिए थी। स्वतंत्रता संयम से आत्मनियंत्रण से अनुबंधित हो तो आत्मसाधना है। नहीं तो वह स्वच्छंदता में परिणत होती है। एक बूँद ने सोचा मैं हूँ इसलिए सागर है फिर मैं ही क्यों न सागर बन जाऊँ। बूँद का अस्तित्व मिट गया। एक बूँद ने सोचा- मैं इस विशाल सागर का अंग हूं। वे बूँदे सागर के सीनेपर मोतियोंसी चमकने लगी।

एक बार जमाली अस्वस्थ थे। शिष्योंसे कहा, ''मेरे लिए शय्या लगाओ।'' कुछ ही क्षणोंमें पूछा, शय्या ! तैयार हो गई ? उत्तर मिला, नहीं, अभी हो रही है। फिर अस्वस्थ होनेसे शीघ्रता में फिरसे पूछ बैठे, ''शय्या! अभी तक हुई नहीं।'' पुनः उत्तर मिला, ''अभी होने को बाकी है।'' जमाली तुरंत चौंक गए, ''बोल उठे - अरे ! महावीर का सिध्दांत यहाँ झूठा ठहरता है।'' वो कहते है, ''चलमाणे चलिए, कडमाणे कडे, ये कथन एकदम झूठा साबित होता है।''

क्रिया अभी चल रही है उसे पूर्ण हुई कैसे कहा जा सकता है, जब तक वह क्रिया, वह कार्य पूर्ण न हो जाए, इसलिए महावीर का कथन असत्य है। अधूरा सत्य, एकांगी सत्य आग्रह निर्माण करता है। जिसकी डोरी अहंकार से बंधी हुई होती है, वह भगवान को असत्य ठहराने लगा। भूल गये स्वयं को, अस्वस्थता को ऐसे आवेश में आ गए जैसे कोई परम सत्य खोज लिया हो, कोई खजाना हाथ लग गया हो ।

शिष्योंने समझाया- भगवान का कथन निश्चयनय की दृष्टि से सत्य है । कारण निश्चय नय की अपेक्षा से होने और पूर्ण होने के क्षणों में अभिन्नता है। तभी कार्य सधा है, किंतु जमाली तो अडे हुए थे। सत्य को स्वीकार ने में अहंकार बाधक होता है। यह सत्यान्वेषी को जानना चाहिए।

भगवान एक बार चंपा पहुँचे। जमाली भी वहाँ आये। वे भगवान के समवशरण में आये, दर्शन वंदन के लिए नहीं पर यह कहने के लिए कि मुझे भी केवलज्ञान हो गया है।

भगवान ने कहा, ''केवलज्ञान कोई पदार्थ नहीं है जिसके होनेपर स्वयं केवली को कहना पडे, ज्ञान घोषित करने की चीज नहीं है।''

गौतमस्वामी ने जमाली से आत्मा के संदर्भ में कुछ प्रश्न पूछे।

जमाली उसका उत्तर नहीं दे पाये, मुँह पीला पड़ गया। आग्रह की शीलापर खडे जमाली का अंह झुकने को तैयार नहीं था। सत्य के मोती तो अहं के निकल जाने के बाद ही हाथ आते है ।

जमाली समवशरण से चले गए। जहाँ आकर उद्‌भट विद्वानों के अहंकार का ज्वर उतर गया। उन्हें सत्य का बोध हुआ वे आत्मदर्शन कर गये, वहाँ जमाली खाली हाथ लौट गये।

हरेक के सामने स्वयं को ज्ञानी घोषित करनेवाले जमाली और उसके अनुयायी सत्य से, आत्मदर्शन से वंचित होते है। लेकिन अहंकार पूजा जाना चाहता है। प्रतिष्ठित होना चाहता है, अमर होना चाहता है। पर झूठी आत्ममुग्धता आत्मदर्शन कैसे करा पाएगी ? स्वयं घोषित आत्मज्ञानी भगवान, एक आत्मछलावे में भटकते रहते हैं, दूसरोंको भटकाते है। इनका आकर्षण खींचता है, पर निकट जानेपर खत्म हो जाता है। आत्मखोजी इसके आकर्षण से बचे तभी ना ?

उधर प्रियदर्शना जो जमाली की गृहस्थ अवस्था में पत्नी थी एक दिन भगवान के अनुयायी ढंक ने उनको सही मार्गपर लाने के लिए कुम्हार शाला में एक प्रयोग किया। वह भी जमाली के सिध्दांत को मानती थी। ढंक ने मौका देखकर प्रियदर्शना के वस्त्रपर अंगारा डाल दिया। वह चिल्ला उठी, ''मेरा वस्त्र जल गया - जल गया।''

ढंकने तुरंत सूत्र पकड़ते हुए कहा, ''आपके मत के अनुसार अभी जला कहाँ है? जब पूर्ण जल जाय तब कहना की जल गया।''

ढंक के कथन को सुनकर साध्वी प्रियदर्शना को गहरी चोट लगी अरे ! मैंने अज्ञान और मोह में तीर्थंकर और उनके सिध्दांतों की अवहेलना की है। उन्हें पश्चाताप हुआ वह तुरंत भगवान के समवशरण में पहुँच गई।

भगवान को त्रिवार वंदन नमस्कार करके अपने कृतकार्य की आलोचना की और भगवान को अनुनय किया, हे प्रभो ! इसका मुझे प्रायश्चित प्रदान करे । प्रायश्चित करके वह पुनः भगवान के धर्मसंघ में सम्मिलित होकर श्रमणी संघ में समर्पित हो गई।

तत्पश्चात् गौतम स्वामी भगवान से पूछते है, – ''मनुष्य सत्य को जानते हुए भी उसे स्वीकारता नहीं और असत्य का आग्रह करता है, इसके पीछे क्या कारण है ?''

भगवान ने कहा, ''जब तक मिथ्या दृष्टि नहीं जाती तब तक असत्य का आग्रह होता है। मिथ्यात्व सत्य को स्वीकारने में बाधक बनता है।

आत्मचर्चा बहुत होती है, पर मेरे तेरे का और मत का मिथ्यात्व गहराई तक जमा रहता है। मिथ्यात्व एक आत्मऊँचाई तक पहुँचने पर भी चट्टान की तरह होता है, जो टूटता नहीं। वह पुनः कब नीचे पटक देगा पता नहीं चलता जिसमें जीवात्मा संभल नहीं पाता ।

आत्मदर्शन के पथपर से आग्रह की शीला हटनी चाहिए, तभी सम्यक्त्व का प्रकाश होगा, अज्ञान अंधकार दूर होगा । (क्रमशः) ●


**नाशिकवाला चंपालाल**

**गणेशप्रसाद महाराज केटरर्स**

लग्न व शुभप्रसंगी गुजराथी, मारवाडी, पंजाबी व महाराष्ट्रीयन पद्धतीचे तसेच सर्व पद्धतीचे स्वयंपाक व बुफे डिनरचे कॉन्ट्रॅक्ट स्विकारले जातील.

लक्ष्मी निवास (धुमाळ) घर नं. १०४, मंगळवार पेठ, शाळा नं. १५ (मुलांची) कमला नेहरू हॉस्पिटलमागे, पुणे ११ फोन : ०२०-२६११११५६३, ३२५१६७३३ मोबाईल : ९८२२३२९५०९, ९४२२३१६४२९, ९३७०६५६५०९


# सुख, दुःख और शान्ति

**लेखक : आचार्य श्री विजयरत्नसुन्दरसूरिजी**

'सुख' शब्द शायद प्रतिदिन सुनाई देता है। परन्तु वह शब्द सुनते ही कई लोगों की आँखों के सामने संपत्ति, गाडी, बंगला इत्यादि सामग्रियाँ आ जाती हैं। कइयों की आँखों के सामने असुविधाओं को एक तरफ धकेलने वाली 'सुविधाएँ' आ जाती हैं। जबकि कइयों की आँखों के सामने जो है उसमें प्रसन्न रहने की कला सिखानेवाला 'संतोष' आता है।

मन को जाँच लेना कि वह सुख किसमें मान रहा है ? सामग्री में सुविधाओं में अथवा संतोष में ?

दुर्गंध जिसे अच्छी नहीं लगती उसे कचरे का ढेर भी अच्छा नहीं लगता। गन्दी नाली जिसे अच्छी नहीं लगती उसे गन्दगी भी अच्छी नहीं लगती। झोपड़पट्टी जिसे अच्छी नहीं लगती उसे दरिद्रता भी अच्छी नहीं लगती,

परन्तु जीवन में दुःखद आश्चर्य तो यह निर्मित हुआ है कि हमें दुःख बिल्कुल अच्छे नहीं लगते, परन्तु उन दुःखों के लिए आमंत्रणपत्रिका रूप बनने वाले पाप बहुत अच्छे लगते हैं।

बोलने के मामले में हम यदि स्पष्ट हो जाएँ कि **''मुझे शान्ति के लिए ही बोलना है''**

तो अनावश्यक– जैसा तैसा बोलना निश्चित ही कम हो जाए और जीने के मामले में हम यदि स्पष्ट हो जाएँ कि


**''शांति स्थापित हो वैसा ही जीवन मुझे जीना है''**

तो मर्यादाहीन स्वच्छंदतायुक्त जीवनशैली पर निश्चय ब्रेक लग जाएगा। ●


**समाजाची आवड, समाजाची निवड**

**जैन जागृति**

## कव्हर तपशील - जानेवारी २०२३




❖ **सम्मेद शिखरजी तीर्थ – झारखंड**

२० तीर्थंकरांची व अनेक संतांची मोक्ष भूमी श्री सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्राला झारखंड सरकारने पर्यटन स्थळ म्हणून जाहीर केल्याने जैन धर्मियां मध्ये नाराजीची लाट पसरली आहे. संपूर्ण भारतात व परदेशातील जैन समाजा तर्फे सम्मेद शिखरजी बचाओ आंदोलन करण्यात येत आहे. (बातमी पान नं. १५)

❖ **भारतीय जैन संघटना – अधिवेशन**

भारतीय जैन संघटनाचे राष्ट्रीय अधिवेशन उदयपुर येथे १७ व १८ डिसेंबर रोजी उत्साहात संपन्न झाले. (बातमी पान नं. ८५)

❖ **प्राकृत–इंग्रजी महाशब्द कोश – प्रकाशन**

प्राकृत–इंग्रजी महाशब्द कोशाचा ९ वा खंड डिक्शनरी प्रकाशन ३ डिसेंबर रोजी पुण्यात मा. सुधा मुर्ती, श्री. अभयजी फिरोदिया यांच्या हस्ते झाले. (बातमी पान नं. १९)

❖ **आनंद तीर्थ चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे**

पुणे येथील आनंद तीर्थ चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पूना हॉस्पिटलला ५ लाख रुपयांची देणगी देण्यात आली. (बातमी पान नं. ८६)

❖ **श्री. वालचंदजी संचेती – पुरस्कार**

पुणे येथील श्री. वालचंदजी देविचंदजी संचेती यांना शैक्षणिक क्षेत्रातील योगदानासाठी दगडुशेठ हलवाई दत्त मंदीर ट्रस्ट तर्फे विशेष गौरव करण्यात आला. (बातमी पान नं. ७७)

❖ **ॲड. पांडुरंग थोरवे – पुरस्कार**

विधी व न्याय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड श्री. पांडुरंगजी थोरवे यांना सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे 'सूर्यगौरव राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. (बातमी पान नं. ८३)

❖ **श्री. विनोद शहा – पुरस्कार**

पुणे येथील लेखक–कवी श्री. विनोद कां. शहा यांच्या रचनात्मक लेखनाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. टॉप १०० स्पर्धकांत त्यांची निवड झाली आहे. (बातमी पान नं. ८३)●

WE ARE
BRAND CREATORS
ADVERTISE WITH US



Jain Jagruti
(Since 1969)
Mobile : 9822086997, 8262056480
E-mail : jainjagruti1969@gmail.com
Website : www.jainjagruti.in